दिनांक 16/01/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.223

विषय – नगपरिषद मागासवर्गीय 5% योजनेअंतर्गत आंबेडकरनगर मधील स्मशानभूमीचे बांधकाम करणेचे कामास मंजूरी देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी इंजिनियर यांची दिनांक 11/01/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

नगरपरिषदेच्या वार्षिक सन 2023 - 2024 च्या अंदाजपत्रकामध्ये नगपरिषद मागासवर्गीय 5% योजनेअंतर्गत र.रू. 15,00,000/- ची तरतूद करणेत आलेले आहे. आज अखेर रक्कम खर्च झालेली नाही. आंबेडकरनगर मधील स्मशानभूमी मध्ये शेड बांधणे, पेव्हींग ब्लॉक बसविणे, रंगकाम करणे इत्यादी कामे करणेची आहेत. याबाबत नागरीकांची वारंवार नगपरिषदेकडे मागणी होत आहे. नगपरिषद मागासवर्गीय 5% योजनेअंतर्गत आंबेडकरनगर मधील स्मशानभूमीचे बांधकाम करणेचे अंदाजपत्रक र.रू. 13,52,013/- चे तयार झालेले आहे.

तरी नगपरिषद मागासवर्गीय 5% योजनेअंतर्गत आंबेडकरनगर मधील स्मशानभूमीचे बांधकाम करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 16/01/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 224

विषय – स्वच्छ सर्वेक्षण 2024, माझी वसुंधरा अभियान 4.0 अंतर्गत स्वच्छ वार्ड रॅंकिंग स्पर्धा आयोजित करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरिक्षक यांची दिनांक 11/01/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

केंद्र शासनाकडून जाहीर केलेल्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2024 च्या टूलकिट मधील जन आंदोलन मधील इंडिकेटर क्रमांक 8.7 (स्वच्छ वार्ड रॅंकिंग) नुसार, स्वच्छ सर्वेक्षण 2024, माझी वसुंधरा अभियान 4.0 अंतर्गत विटा नगरपरिषदेमार्फत स्वच्छ वार्ड रॅंकिग अंतर्गत विविध आस्थापना स्पर्धेचे आयोजन करावयाचे आहे. या सर्व स्पर्धा सर्व आस्थापनांसाठी खुल्या असून प्रत्येक स्पर्धेमधील प्रथम, द्वितीय, तृतीय विजेते घोषित करून सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व प्रसिध्दी देणेचे आहे. सदर स्पर्धा खालील प्रमाणे

1. स्वच्छ हॉटेल स्पर्धा
2. स्वच्छ शाळा स्पर्धा
3. स्वच्छ शासकीय कार्यालय स्पर्धा
4. स्वच्छ मार्केट असोसिएशन स्पर्धा
5. स्वच्छ सोसायटी (RWA) स्पर्धा
6. स्वच्छ हॉस्पीटल स्पर्धा

तरी विटा शहरामध्ये स्वच्छ सर्वेक्षण 2024 व माझी वसुंधरा 4.0 अभियान अंतर्गत स्वच्छ वार्ड रॅंकिंग स्पर्धा आयोजित करणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 16/01/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 225

विषय – स्वच्छ सर्वेक्षण प्रोत्साहनात्मक बक्षिस रक्कम अनुदान मधून नगरपरिषद हद्दीत पंचमुखी गणेश मंदिर पाण्याची टाकी येथे LED (एल.ई.डी) स्क्रीन उभा करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विदयुत अभियंता यांची दिनांक 15/01/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

स्वच्छ सर्वेक्षणामध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक बक्षिस रकमेच्या विनियोगाची कार्यपद्धती दिनांक 18 सप्टेबर 2019 च्या शासन निर्णयाद्वारे विहित करणेत आलेली आहे. शासन निर्णय विवरणपत्र अनु.क्र. 4 अन्वये स्वच्छ सर्वेक्षण व कचरा मुक्त शहरांचे तारांकित मानांकन यांच्या अनुषंगिक कामानुसार स्वच्छ सर्वेक्षण व कचरा मुक्त शहरांचे तारांकित मानांकन यांची प्रचार प्रसिद्धी करणेसाठी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी LED स्क्रीन उभा करणे आवश्यक आहे. जेणेकरून स्वच्छ सर्वेक्षण व कचरा मुक्त शहर यांच्या प्रचार प्रसिद्धी मुळे IEC या स्वच्छ सर्वेक्षण मधील घटकाचे गुण आपल्या शहरास प्राप्त होवून शहराचे गुणांकन वाढण्यास मदत होईल तसेच जाहिरात प्रसिद्धीतून नगरपरिषदेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होईल. तसेच सदरील स्क्रीनचा वापर वातावरणीय घटक तापमान, आर्द्रता, हवेची गुणवत्ता तसेच इतर महत्वाच्या घटकांची माहिती तसेच नगरपरिषदेच्या महत्वाच्या सूचना दर्शवण्यासाठी होईल. तरी स्वच्छ सर्वेक्षण प्रोत्साहनात्मक बक्षिस रक्कम अनुदान मधून नगरपरिषद हद्दीत पंचमुखी गणेश मंदिर पाण्याची टाकी येथे LED (एल.ई.डी) स्क्रीन उभा करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 16/01/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 226

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जावून घंटागाडीव्दारे ओला,सुका व घातक कचरा वेगवेगळा संकलन करणे, रस्ते, सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुता-या तसेच गटर यांची दैनंदिन साफसफाई करणे व कच-याची घनकचरा व्यवस्थापन भूमी पर्यंत वाहतूक करणेस मुदतवाढ मिळणेबाबत श्री.गजानन रामचंद्र निकम यांचे दाखल अर्जावर निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरिक्षक यांची दिनांक 15/01/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2) दै.लोकमत, सांगली जा.क्र.33 दि.03/10/2022 ची प्रसिध्द केलेली निविदा.
3) नगरपरिषद प्रशासकीय ठराव नं. 98 दि.01/12/2022 ने श्री.गजानन रामचंद्र निकम,विटा यांची मंजूर केलेली निविदा.
4) श्री.गजानन रामचंद्र निकम, विटा यांना दिलेला कार्यादेश क्र.3176 दि.05/12/2022

विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जावून घंटागाडीव्दारे ओला,सुका व घातक कचरा वेगवेगळा संकलन करणे, रस्ते, सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुता-या तसेच गटर यांची दैनंदिन साफसफाई करणे व कच-याची घनकचरा व्यवस्थापन भूमी पर्यंत वाहतूक करणेची निविदा प्रशासकीय ठराव नं. 98 दि.01/12/2023 ने गजानन रामचंद्र निकम , विटा यांची मंजूर करणेत आली होती. या संस्थेमार्फत निविदेनुसार काम करीत आहे. सदर निविदेची मुदत दि.05/12/2023 रोजी समाप्त झाली आहे. सदर कामास मुदतवाढ मिळणेकामी मक्तेदार गजानन रामचंद्र निकम , विटा यांनी अर्जाने कळविले आहे.

सध्या सदर कामाच्या तांत्रिक मंजुरीस मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, सांगली यांचेकडून दि.05/12/2023 रोजी मान्यता मिळालेली असून मा.प्रधान सचिवसो, नगरविकास विभाग, मुंबई यांचेकडे प्रशासकीय मंजुरी मिळणेकामी जावक क्र.2610 दि.15/12/2023 ने प्रस्ताव पाठविणेत आलेले आहे. या कामाच्या प्रशासकीय मान्यता, निविदा प्रसिध्द करणे, निविदा मागविणे, निविदा मंजूर करणे कामास कालावधी लागणार आहे.

तरी विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जावून घंटागाडीव्दारे ओला,सुका व घातक कचरा वेगवेगळा संकलन करणे, रस्ते, सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुता-या तसेच गटर यांची दैनंदिन साफसफाई करणे व कच-याची घनकचरा व्यवस्थापन भूमी पर्यंत वाहतूक करणे कामास पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत किंवा 6 महिने यापैकी जी प्रक्रिया आगोदर होईल तोपर्यंत मुदतवाढ देणेत येत आहे. तसेच यावर होणा-या खर्चास मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 16/01/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 227

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जाऊन गोळा केलेल्या कच-याचे घनकचरा डेपोवर वर्गीकरण करणे, घनकचरा डेपो देखभाल करणे, डेपो वरील विविध मशीन चालवणे व देखभाल करणे, डेपोवर गोळा होणारा कचरा जेसीबी मशीनद्वारे कचरा कंपोस्टींग साईट व लॅंडफिल साईटवर घेऊन जाणे व अनुषंगिक इत्यादी सर्व कामे करणेबाबत दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरिक्षक यांची दिनांक 15/01/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जाऊन गोळा केलेल्या कच-याचे घनकचरा डेपोवर वर्गीकरण करणे, घनकचरा डेपो देखभाल करणे, डेपो वरील विविध मशीन चालवणे व देखभाल करणे, डेपोवर गोळा होणारा कचरा जेसीबी मशीनद्वारे कचरा कंपोस्टींग साईट व लॅंडफिल साईटवर घेऊन जाणे व अनुषंगिक इत्यादी सर्व कामे करणेबाबत खालील ई निविदा दाखल आहेत.

| | |
|---|---|
| 1) एन. एच.पटेल कॉन्ट्रॅक्टर, नाशिक | अंदाजपत्रकीय दरापेक्षा -11.900% कमी दराने |
| 2) श्री.गजानन रामचंद्र निकम | अंदाजपत्रकीय दराने |
| 3) सह्याद्री ॲग्रो सायन्स, शिरोळ | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.000% जादा दराने |
| 4) भैरवनाथ एन्व्हायरमेंट सोल्युशन प्रा.लि,विटा | अंदाजपत्रकीय दरापेक्षा -3.000% कमी दराने |

उपरोक्त ई निविदापैकी एन. एच.पटेल कॉन्ट्रॅक्टर, नाशिक यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा